# <u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ याची जबानी</u>

**मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की :**

माझे नाव : रविंद्र सुखदेव भांड
माझे वाय : २६ वर्षे,
व्यवसाय : नोकरी
राहणार : जारकरवाडी, ता. आंबेगाव, जि,पुणे

## <u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. वाय. जे. चन्ने. यांचे मार्फत</u>

**१.** मी आरोपींना ओळखतो. ते न्यायालयात हजर आहेत. घटना किती तारखेला किती वाजता व कोठे घडली ते मला सांगता येणार नाही. घटनेच्यावेळी काही झाले नाही. माझे पत्नीने मंचर पोलीस ठाण्यात घटनेबाबात फिर्याद दिली होती किंवा कसे ते मला माहित नाही. असे काही घडले नाही की दि. ९/७/२०१८ रोजी आरोपीनीं मला व माझे पत्नीला मारहाण करून आमचे वाटोळे करतो असे शिवीगाळ दमदाटी दिली व आरोपी क्रमांक १ ने मला पाठीमागून मीठी मारून माझे मनास लज्जा उत्पन्न होइल असे वर्तन केले.

**(साक्षीदार सत्य लपवित असल्याचे कथन करून सहा. सरकारी अभियोक्ता यांनी त्यास उलट तपासणीचे स्वरूपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. पुरावा कायादा कलम १५४ अन्वये परवानगी दिली.)**

**२.** पोलीसांनी माझेकडे चौकशी केली नव्हती. सरकारी वकीलांनी साक्षीदारास त्याचे जबाबातील अधोरेखांकीत भाग अ वाचून दाखविला. सदर बाब माझे फिर्यादीत का नमुद आहे याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की दि. ९/७/२०१८ रोजी आरोपीनीं मला व माझे पत्नीला मारहाण करून आमचे वाटोळे करतो असे शिवीगाळ दमदाटी दिली व आरोपी क्रमांक १ ने मला पाठीमागून मीठी मारून माझे मनास लज्जा उत्पन्न होइल असे वर्तन केले. हे म्हणणे खरे आहे की माझी व आरोपींची न्यायालयाबाहेर तडजोड झालेली आहे. हे

म्हणणे खरे नाही की तडजोड झाल्याने मी आरोपींना वाचविण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलट तपास आरोपीं तर्फे ॲड. ए. जी. पोखरकर यांचे मार्फत</u>**

उलट तपास नाकारला.

फेर तपास नाही. श्रवणोत्तर स्वीकृत

दिनांक. २७/०३/२०१९ (भानुप्रताप चौहान)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग
घोडेगाव. पुणे.